# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०६
# सभा क्र.०७, दिनांक १०/०५/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. १०/०५/२०२४ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | प्रभारी नगरसचिव |
| मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा. माधव जगताप | – | उपायुक्त, अतिक्रमण, क.आ.क.सं.प्रमुख |
| मा. ॲड. श्रीमती निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा. सौ. किशोरी शिंदे | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. १ |
| मा. अविनाश सकपाळ | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. ५ |
| मा. अशोक घोरपडे | – | मुख्य उद्यान अधिक्षक |
| मा. नंदकुमार जगताप | – | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. श्रीमती मनिषा नाईक | – | सहा. आरोग्य अधिकारी |
| मा. सुर्यकांत देवकर | – | सहा. आरोग्य अधिकारी |

## दाखल विषय

**विषय क्र. ४२ त्वर्य**

सन २०२३-२४ मधील दुसरी सहामाही दि.०१/१०/२०२३ ते ३१/०३/२०२४ साठी चे अर्धवार्षिकआर्थिक पत्रक सादर करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/३५, दि.१०/०५/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

## कार्यपत्रिकेवरील विषय

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. ३५**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०४/२०२४ ते दि.३०/०४/२०२४ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/६२०, दि.०६/०५/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ३६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील बिबवेवाडी, भवानी पेठ, व कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांचे जा.क्र.उआ-५/४५०,दि.०६/०५/२०२४ चे पत्र

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ३७**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०४/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/३०, दि.०२/०५/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ३८**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पूरग्रस्त, गवनि पुनर्वसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदानिधाराकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सीएसओ/१३९३, दि.१८/०२/२०१९ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ३९**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सध्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१००७, दि.२२/०३/२०२१ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र. ४०**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट २३ गावांकरिता सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प(STP) व ड्रेनेज लाईन योजनेकरिता आवश्यक असलेला निधी कर्ज/कर्जरोखे द्वारे उभारणी करणे व त्यासाठी तांत्रिक सल्लागार व मर्चंट बँकर म्हणून एस.बी.आय.कॅपीटल मार्केट लि. यांची नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/११८५,दि.०४/०१/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदरचे विषयपत्र मागे घेण्यात आले.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र. ४१**

पुणे, पेठ बाणेर स.नं. ३२(पै) येथील अस्तित्वातील कमीतकमी ९.० मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१०(१) नुसार १२.० मी. रुंद करणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/३३, दि.०६/०५/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

सही /– XXX
**(योगिता भोसले)**
**प्र. नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. ११/०६/२०२४ रोजी वृत्तांत मंजूर.**

सही /– XXX
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**